मंत्रालयीन सेवा
जनहिताय सर्वदा

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
ग्राम विकास विभाग, १ ला मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ
फोर्ट , मंत्रालय, मुंबई - ४०० ००१

**usest7.rdd-mh@gov.in** दूरध्वनी क्र.०२२-२२०६०६०३

क्र. वैप्रदे-२०२५/प्र.क्र.६४/आस्था-७ दिनांक :- ०५ फेब्रुवारी, २०२५

**प्रति,**

१) **विभागीय आयुक्त (सर्व).**
२) मुख्य कार्यकारी अधिकारी ,
जिल्हा परिषद (सर्व).

**विषय :** वैद्यकीय देयक प्रतिपूर्तीचा मूळ प्रस्ताव (हार्ड कॉपी) व त्यासोबत प्रस्तावाची ई ऑफीस प्रणालीवर रिसिप्ट तयार करून सॉप्ट कॉपी सादर करणेबाबत.

महोदय,

ग्राम विकास विभागाकडे जिल्हा परिषद कर्मचारी यांचे वैद्यकीय देयक प्रतिपूर्ती मिळणेबाबतचे मूळ प्रस्ताव मंजुरीसाठी प्राप्त होतात. यानुषंगाने कळविण्यात येते की, दिनांक १०.०२.२०२५ पासून ग्राम विकास विभागाकडे सादर होणारे वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकाचे प्रस्ताव सादर करताना हार्ड कॉपी बरोबरच संपूर्ण वैद्यकीय प्रतिपूर्ती देयक प्रस्तावाची स्कॅन कॉपी ई ऑफीस द्वारे **रिसिप्ट** तयार करून सादर करावी. तसेच विभागीय आयुक्त यांच्या मागणीपत्रामध्ये सदर ई- आफीस रिसिप्ट चा क्रमांक (संगणक सांकेतांक) नमूद करूनच मूळ प्रस्ताव सादर करावा.

सार्वजनिक आरोग्य विभागाकडे सादर होणाऱ्या प्रस्तावासोबत नादेय रक्कमांच्या बाब निहाय यादी सोबत जोडून सादर करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तावामध्ये सादर केलेल्या बीलामधील सर्व नादेय रक्कमांच्या बाब निहाय यादी सोबतच्या विवरणपत्र-अ मध्ये तयार करून तसेच त्यासोबत दिलेल्या प्रमाणपत्रानुसार प्रमाणित करून प्रस्तावासोबत सादर करण्यात यावी, ही विनंती

आपला,

( नितीन स .पवार )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:- १. निवड नस्ती- आस्था-७

ग्रामविकास विभाग प्रकरण क्रमांक वैप्रदे-२०२५/प्र.क्र.६४/आस्था-७, दिनांक ०५ फेब्रुवारी,२०२५

## विवरणपत्र- अ

## नादेय बाबींची यादी

| अ.क्र | उपप्रमाणक क्रमांक व दिनांक | बाबनिहाय नादेय तपशलि | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | | | |
| २. | | | |
| | | एकुण- | |

-: प्रमाणपत्र :-

प्रमाणित करण्यात येते की, श्री.------------------,पदनाम------, कार्यालय------- यांच्या वैद्यकीय प्रतिपूती देयक खर्चाच्या प्रस्तावातील देयक/उपप्रमाणके तपासली असून, सदर प्रस्तावातील देयक/उपप्रमाणक यांची बाब निहाय नादेय यादी, उपरोक्त विहित नमुण्यात तयार करण्यात आलेली असून, सदरची यादी तपासली असून, ती योग्य असल्याची खात्री केलेली आहे. त्यानुसार या प्रकरणी बाब नादेय यादीची रक्कम रु.----/- इतकी आहे.

तालुका आरोग्य अधिकारी/ जिल्हा आरोग्य अधिकारी